REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018
UGC APPROVED JOURNAL NO. 48514

# शेती क्षेत्राच्या विकासामध्ये जलसिंचन प्रकल्पाची भूमिका

प्रा. डॉ. प्रफुल्ला सुदामे
वाणिज्य विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापक,
सी. पी. ॲण्ड बेरार ई. एस. महाविद्यालय, नागपूर.

**गोषवारा :**
भारतामध्ये शेती क्षेत्राच्या उत्पादनात वाढ करण्यामध्ये जल सिंचन व्यवस्था हा महत्वाचा घटक असून शेतकरी पारंपारिक शेतीकडून आधुनिक शेतीकडे वळाले. तंत्रज्ञानामध्ये बदल होऊन शेतकरी सुधारीत तंत्रज्ञान वापरु लागल्यामुळे उत्पादनामध्ये वाढ झाली. या बदलाबरोबरच सिंचनाची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे शेती लावगडीचे स्वरुप बदलू लागले. शेतकरी पाण्याची सोईमुळे विविध पीकाचे उत्पादन घेऊ लागला. शेती करण्याकडे व्यापारी दृष्टिकोन निर्माण झाला व सिंचनामुळे दुबार पीके घेणे शक्य झाले. या सर्व कारणामुळे शेतकऱ्याचे उत्पादन वाढून त्यांच्या राहणीमानामध्ये सुधारणा झाली. शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाल्याचा परिणाम शेतमजूरावर झाला व शेत मजूर आर्थिक दृष्ट्याा सक्षम होत गेला. पूर्वी जे मोठ्याा प्रमाणामध्ये पुर, महापुर येत होते ते सिंचनाच्या सोईमुळे येणे बंद झाले याचे कारण म्हणजे सिंचनाच्या सोईसाठी पावसातील पाणी अडविल्या गेले. तसेच प्रकल्पामध्ये पाणी साठवल्याने त्या पाण्यातून विद्युत निर्मिती करण्यास मदत झाली.



**शब्दसंकेत :** शेती, सिंचन, उत्पादन, पीक, विकास.

## प्रस्तावना:

प्राचीन काळापासुन भारत हा प्रामुख्याने शेती क्षेत्रावरच अवलंबून असल्यामुळे भारताला कृषी प्रधान देश म्हटले जाते. आजही भारतातील 68 ते 69 टक्के लोक हे शेती व शेतीशी निगडीत व्यवसाय करुन आपला उदरनिर्वाह करतात. परंतु भारतीय शेती ही निसर्गावर निर्भर करत असल्यामुळे पाण्याचा प्रश्न निर्माण होतो. निसर्ग एक प्रकारचा जुगार आहे. अनियमित पावसामुळे शेती उत्पादनात अनिश्चितता येत असून याचा एकंदर परिणाम आर्थिक स्थितीवर होतो. शेतकऱ्याला अशा प्रकारच्या संकटातून मुक्त करण्यासाठी किंवा पावसाचा उत्पादनावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी सिंचनाचा विकासा होणे गरजेचे आहे. भारतातील सुमारे 52 टक्के जमीन ओलीताखाली आणल्या गेली व शेती उत्पादनातील वाढ करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. वर्तमान स्थितीमध्ये शेतीच्या उत्पादनात वाढीचे कारण म्हणजे सिंचन व्यवस्था होय. देशामध्ये एकूण 142.6 कोटी हेक्टर जमीन असून त्यापैकी 57 कोटी हेक्टर जमीन सिंचनाखाली असल्याचे दिसून येते. भारतामध्ये नदी, तलाव, विहीरी अशा प्रकारच्या साधनांचा सिंचनासाठी उपयोग केला जातो. बिहार, उत्तरप्रदेश, पंजाब, ओरिसा, गुजरात,

मध्यप्रदेश व महाराष्ट्र या राज्यामध्ये विहीरीच्या माध्यमातून पाणी पुरपठा केला जातो तर सर्वात जास्त पाणी पुरवठा नहराच्या माध्यमातून केला जातो. याअंतर्गत नेहमी वाहणारे नहरे, खुली नहरे, झाकली या सर्व प्रकारच्या साधनांचा समावेश होतो.

नियोजनाच्या काळातील सिंचनाचा विचार केला असता दहाव्या पंचवार्षिक योजनामध्ये 88.153 कोटी रुपये खर्च करुन 18.85 लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आणल्या गेली. असे असले तरी ही फारशी प्रगती नसल्याचे दिसून येते कारण शेती प्रधान देशामध्ये एवढी सुविधा पुरेशी नसल्याचे दिसून येते. भारताच्या सिंचन आयोगानुसार सन 1972 साली केलेल्या अंदाजानुसार भुपृष्ठावरील उपयोग करण्यायोग्य आणि भुपृष्ठावरील उपयुक्त असे दोन्ही मिळून 87,000 कोटी धनमिटर पाणी दरवर्षी सरासरी उपलब्ध होत आहे. त्यापैकी 1950 ते 1951 साली ओलीताखाली अंदाजे 17,250 कोटी घनमिटर पाण्याचा आणि मार्च 1974 अखेरपर्यंत 3,36,000 कोटी घनमिटर पाण्याचा उपयोग करण्यात आला होता.

## अभ्यासाची उद्दिष्ट्योः

1. भारतीय शेती क्षेत्रामध्ये जलसिंचनाचे महत्व याचा अभ्यास करणे.
2. जलसिंचन प्रकल्पाच्या व्यवस्थामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

## अभ्यास पद्धतीः

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम तथ्य संकल्पनावर आधारित असून यामध्ये विविध पुस्तके, मासिके, वार्षिक अहवाल, वर्तमानपत्रातील लेख यांचा आधार घेतला आहे.

## पाणी पुरवठ्याचे महत्व :

1) पावसाचा अनियमितपणा – शेतीचा व्यवसाय म्हणला की, पाणी प्रश्न उपस्थित होतो, कारण पाण्याच्या अभावी शेती करणे शक्य नाही. शेती ही निसर्गावर अवलंबून असल्यामुळे तो एक प्रकारचा जुगारच असल्याचे मानले जाते. शेतकरी व्याजाने पैसे घेऊन त्या पैशाचे बि.बीयाने शेतीमध्ये पुरुन शेतीशी एक जुगारच खेळतो. जर निसर्गाने साथ दिली तर उत्पादनामध्ये वाढ होत अन्यथा सावकाराचे कर्ज. भारतामध्ये काही भागामध्ये अतिवृष्टीमुळे पिके वाहून जातात तर काही भागात अनावृष्टीमुळे पिके वाळून जातात त्यामुळे भारतात कधी ओला दुष्काळ पडतो तर कधी कोरडा दुष्काळ पडतो. या सर्व प्रश्नाला उत्तर म्हणून किंवा पावसाचा अनियमितपणा दुर करण्यासाठी शेतीला नियमित पाणी पुरवठा करण्यासाठी पाण्याची व्यवस्था करणे गरजेचे आहे.

2) पावसाचे असमान वितरण – भारत हा खुप मोठा देश असून भारतामध्ये अनेक राज्ये आहेत. या सर्व राज्यामध्ये पावसाचे वितरण असमान असल्याचे दिसून येते. राजस्थानमध्ये $10^0$ इंच पाणी पडतो तर चेरापुंजी येथे $450^0$ ते $500^0$ इतका पाऊस पडतो. यामुळे वेगवेगळ्या राज्यात पिकाची रचना वेगळी असून उत्पादन कमी अधिक प्रमाणात होतांना दिसून येते.

3) विशेष पिकांचे उत्पादन – ऊस, गहू, तांदूळ इत्यादी पिकांना नियमित पाणी पुरवठ्याची आवश्यकता असते. अशा वेळी ज्या भागामध्ये पाऊस कमी प्रमाणात असेल अशा भागात पाणी पुरवठ्याच्या सोईमध्ये वाढ करणे आवश्यक आहे.

4) एका वर्षामध्ये अनेक पिके – भारत अति लोकसंख्येचा देश असल्यामुळे अन्नधान्याची गरज अधिक असते. 1951 चा विचार करता लोकसंख्या कमी प्रमाणात होती परंतु वाढत्या लोकसंख्यमुळे अन्नधान्याची मागणी वाढत गेली. तसेच विदेशातून अन्नधान्य आयात करण्याची वेळ येत असल्यामुळे

भारतातच पाण्याची सुविधा उपलब्ध करुन एका वर्षातुन अनेक पिके घेणे शक्य झाले. याचा परीणाम असा झाली की, अन्नधान्याची आयात कमी झाली व स्वदेशी चलन वाचले.

**5) नवीन जमीनीमध्ये लागवड –** 1951 मध्ये लोकसंख्या कमी असल्यामुळे अन्नधान्य कमी लागत होते व कमी जमिनीचा वापर होत होता परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे अन्नधान्याची मागणी वाढल्यामुळे व आयात कमी करण्याची असल्यामुळे पडीक जमीन लागवडीखाली आणुन त्यामध्ये उत्पादन करण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते.

### निष्कर्षः

1) विहीर साधनाद्वारे उत्पादनाचे प्रमाण कमी.
2) धारण क्षेत्रापैकी सिंचनाखाली आलेल्या जमिनीचे अल्प प्रमाण आहे.
3) शेती क्षेत्रामध्ये अपेक्षेप्रमाणे उत्पादन होत नाही.
4) खर्चाच्या तुलनेत उत्पादन क्षमता कमी

भारत देश कृषीप्रधान देश आहे असे म्हटल्या गेले असले तरी भारत खरच कृषीप्रधान आहे का? याचा विचार करावा लागतो. आजही भारतीय शेतकरी मोठ्याा प्रमाणात आत्महत्या करतांनाचे विचित्र चित्र समाजामध्ये दिसून येते. भारत देश कृषीप्रधान असता तरी शेतकऱ्याने आपल्या मुलाला शेतकरीच करण्याचे स्वप्न बघीतले असते, भारत देश कृषीप्रधान असता तर विदेशामधून धान्य आयात करण्याची वेळ भारताला आली नसती, भारत देश कृषीप्रधान शेतकऱ्याच्या पिकाला योग्य भाव मिळाला असता या सर्व कारणांचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, शेती क्षेत्रामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

### संदर्भसूचीः

1) कविमंडन विजय, कृषी अर्थशास्त्र, मंगेश प्रकाशन, नागपूर.
2) मिश्र डॉ. जयप्रकाश, (2007) 'कृषी अर्थव्यवस्था', साहित्य भवन पब्लिकेशन्स, आग्रा.
3) ढाले रविन्द्र, डॉ.पंजाबराव देशमुख यांचे कृषीविषयक आर्थिक विचार, 2009.
4) घाटोळे रा. ना. 'समाजशास्त्रीय संशोधन तत्व व पद्धती', श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, 2000.
5) फडणवीस मृणलिनी, देशपांडे प्राची, 'श्रम अर्थशास्त्र', पिंपळापुरे ॲन्ड कं. नागपूर, 2002.
6) सोळूंके आर. एस. 'महाराष्ट्राची अर्थव्यवस्था', कौमास पब्लीकेशन, औरंगपूरा, औरंगाबाद, तृतीयावृत्ती, 2003.
7) कुलकर्णी बी. डी., ढमढरे एस. व्ही., 'अर्थशास्त्रीय संशोधन पद्धती', डायमंड पब्लिकेशन्स, नागपूर, 2007.